पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे
चिंचवड पोलीस स्टेशन
पत्ताः- कामत हॉस्पिटलच्या मागे, चाफेकर चौक, चिंचवडगाव, पुणे - ४११ ०३३.
फोन नं. ०२०-२७३५६७६८, २७३५६७६७.
E mail ID :- pschinchwad.pcpc-mh@nic.in

# --//प्रेस नोट //--

दि. ०९/०८/२०२२

## चिंचवड पोलीस स्टेशन

## तोतया पोलीस बनुन वाहनाची बनावट कागदपत्रे, बनावट पोलीस ओळखपत्र दाखवुन लोकांची फसवणुक करुन एकुण १४ वाहनचोरी केल्याचे उघड, ०२ आरोपी जेरबंद, एकुण ६,९६,०००/- रु किं. चा मुद्देमाल हस्तगत

### (चिंचवड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी )

--- ०० ---

**मा. श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी वाहनचोरी व घरफोडीचे गुन्हयांना प्रतिबंध करून झालेले गुन्हे प्रकर्षाने उघडकिस आणणेबाबत सुचना दिल्या आहेत.** त्या अनुषंगाने श्री कृष्णदेव खराडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिंचवड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील पोलीस उप निरीक्षक श्री.नामदेव तलवाडे,पोलीस उप निरीक्षक श्री. शंभु रणवरे व तपास पथक यांना घरफोडी व वाहनचोरीचे गुन्हे यांना प्रतिबंध करून झालेले गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या.

चिंचवड पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांचे वेगळे पथक तयार करून वाहनचोरी प्रतिबंधक कारवाई सुरू करण्यात आली.पोलीस उप निरीक्षक श्री.नामदेव तलवाडे,पोलीस उप निरीक्षक श्री. शंभु रणवरे यांचे नेतृत्वाखाली पथकातीलसपोफौ पांडुरंग जगताप, पोहवा धर्मनाथ तोडकर, पोलीस अंमलदार रोहीत पिंजरकर, उमेश मोहीते, उमेश वानखेडे, रहीम शेख, पकंज भंदाणे, गोविंद डोके, अमोल माने असे चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पोलीस अंमलदार रोहीत पिंजरकर व उमेश वानखडे यांना खात्रीशीर बातमी मिळाली कि, दोन इसम हे गुरूव्दारा चौक, वाल्हेकरवाडी, चिंचवड येथे एक चोरीची जाभंळया रंगाची, टीव्हीएस ज्युपीटर दुचाकी क्रमांक एम.एच.१४/जी.आर.३११९ अशी नंबर प्लेट असलेली हीचेवर थांबलेले असुन त्यांनी चिंचवड या परिसरात दुचाकी वाहनांची चोरी केलेली आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने,सदर बातमी प्रमाणे बातमीचे ठिकाणी जावुन, पाहणी करून मिळालेल्या बातमीतील वर्णनाचे दोन्ही इसमास शिताफिने ताब्यात घेतले. त्यांचेकडे चौकशी केली असता त्याची नावे (१) दिपक नारायन बनसोडे वय ३१ वर्षे रा, थॉमस कॉलनी, मामुर्डी, चर्च जवळ, देहुरोड, पुणे, (२) श्रीमंत विनायक सुरवसे वय २९ वर्षे रा. गुरूव्दारा चौक, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणेसदर आरोपीकडुन चिंचवड पोलीस स्टेशन कडील गुन्हयातील गाडी व बनावट पोलीस आयकार्ड व पोलीस ड्रेस मिळयाल्याने त्यांना अटक करुन त्यांना विश्वासात घेवून त्यांचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता, ताब्यात घेतलेल्या अटक आरोपी यांचेकडून चोरीच्या १४ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असुन त्याबाबत खालीलप्रमाणे विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

**(१) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं. - ३४६/२०२२ भादवि - ३७९**

**(२) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं. – २२०/२०२१ भादवि – ३७९**

(३) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं. – २६९/२०१८ भादवि - ३७९
(४) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं. – २३७/२०१७ भादवि – ३७९
(५) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं. – ३६२/२०२२ भादवि – ३७९
(६) सांगवी पोलीस स्टेशन गु.र.नं. – ३३३/२०२२ भादवि – ३७९
(७) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. – ५०५/२०२० भादवि – ३७९
(८) निगडी पोलीस स्टेशन गु.र.नं. – ५१४/२०२० भादवि – ३७९
(९) विमाननगर पोलीस स्टेशन गु.र.नं – १३२/२०१६ भादवि – ३७९
(१०) फरासखाना पोलीस स्टेशन गु.र.नं – १३१/२०२२ भादवि – ३७९
(११) एक लाल रंगाची बुलेट मोटारसायकल नं एम एच १४ जे झेड ३०६२
(१२) एक लाल रंगाची अॅक्टीव्ह मोपेड न एम एच १४ के ई ९६७७
(१३) एक महींद्र सेचीरो कंपनीची मोटारसायकल नं एम एच २० सी के ०८२६
(१४) एक स्पेल्डर मोटारसायकल नं. एमएच.१४./के ई./८७६

येणे प्रमाणे एकूण ६,९६,०००/- रुपये किंतमीच्या १४ दुचाकी वाहने जप्त करण्यात आले असून १० गुन्हे उघड करण्यात आलेत. चार दुचाकी वाहनाबाबत अधिक तपास करीत आहोत. सदर अटक आरोपी यांनी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी सदरच्या दुचाकी चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई **मा. श्री अकुंश शिदे साो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ संजय शिंदे साो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री मंचम इपर साो, पोलीस उप आयुक्त,परि ०१, पिंपरी चिंचवड, मा. श्री सागर कवडे, सहा.पोलीस आयुक्त साो, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली कृष्णदेव खराडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस उप निरीक्षक श्री. नामदेव तलवाडे, पोलीस उप निरीक्षक श्री शंभु रणवरे, सपोफौ पांडुरंग जगताप, सपोफौ आर.बी.नरवडे, पोहवा धर्मनाथ तोडकर, पोलीस अंमलदार- रोहीत पिंजरकर, उमेश मोहीते, उमेश वानखेडे, रहीम शेख, पकंज भंदाणे, गोविंद डोके, अमोल माने, कल्पेश पाटील, महीला पोलीस नाईक खोमणे, गजानन आडके** यांनी केली आहे.

(श्री. मंचम इप्पर)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१ पिंपरी चिंचवड